# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

विषय :- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळा समितीत नवीन सदस्यांचा समावेश करणे बाबत.

दिनांक ०६/०६/२०२२ रोजी तत्कालीन महापौर, भिवंडी मनपा यांचे अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराजांच्या नविन अश्वारुढ पुतळा उभारणेकामी पुतळा समिती नेमण्यांत आलेली होती. तथापी सदर पुतळा समितीमध्ये अंशतः सुधारणा करुन नव्याने भिवंडी मतदार संघाचे विद्यमान खासदार, आमदार, मनपा अधिकारी व तज्ञ तसेच, भिवंडी शहरातील सर्व पक्षीय अध्यक्ष इ. यांचा समावेश करुन सदर कामाचे प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजुरी करिता सादर करण्यांत आले होते. सदर प्रस्तावास शहर अभियंता व अतिरिक्त आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २४/०१/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. विषयांकीत कामी नव्याने पुतळा समिती गठीत करणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरिस्तव सविनय सादर.

ठराव क्रं. :- ८९ दिनांक :- ०८/०२/२०२३

दिनांक ०६/०६/२०२२ रोजी तत्कालीन महापौर, भिवंडी मनपा यांचे अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराजांच्या नविन अश्वारुढ पुतळा उभारणेकामी पुतळा समिती नेमण्यांत आलेली होती. तथापी सदर पुतळा समितीमध्ये अंशतः सुधारणा करुन नव्याने भिवंडी मतदार संघाचे विद्यमान खासदार, आमदार, मनपा अधिकारी व तज्ञ तसेच, भिवंडी शहरातील सर्व पक्षीय अध्यक्ष इ. यांचा समावेश करुन सदर कामाचे प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजुरी करिता सादर करण्यांत आले होते. सदर प्रस्तावास शहर अभियंता व अतिरिक्त आयुक्त यांनी केलेल्या शिफारस नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये नव्याने पुतळा समिती गठीत करणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे. सदर पुतळा समिती हि खालिलप्रमाणे असेल.

# पुतळा समिती

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नविन अश्वारुढ पुतळा उभारणेकामी पुतळा समितीमध्ये अंशतः सुधारणा करुन नव्याने भिवंडी मतदार संघाचे विद्यमान खासदार, आमदार, मनपा अधिकारी व तज्ञ तसेच, भिवंडी शहरातील सर्व पक्षीय अध्यक्ष इ. यांचा समावेश करण्यांत येत असुन खालिलप्रमाणे पुतळा समिती गठीत करण्यांत येत आहे.

| | |
|---|---|
| १) मा. महापौर, भि.नि.श.म.न.पा. | - अध्यक्ष |
| २) आयुक्त, भि.नि.श.म.न.पा. | - सह अध्यक्ष |
| ३) पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ | - सदस्य |
| ४) मा. खासदार, भिवंडी लोकसभा मतदारसंघ | - सदस्य |
| ५) मा. आमदार, भिवंडी (पूर्व) विधानसभा मतदारसंघ | - सदस्य |
| ६) मा. आमदार, भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदारसंघ | - सदस्य |
| ७) भिवंडी शहर जिल्हा प्रमुख - बाळासाहेबांची शिवसेना गट | - सदस्य |
| ८) भिवंडी शहर जिल्हा प्रमुख - उद्धव बाळासाहेब ठाकरे गट | - सदस्य |
| ९) अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, भिवंडी शहर | - सदस्य |
| १०) अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भिवंडी शहर | - सदस्य |
| ११) अध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भिवंडी शहर | - सदस्य |
| १२) अध्यक्ष, समाजवादी पार्टी, भिवंडी शहर | - सदस्य |
| १३) अध्यक्ष, कोणार्क विकास आघाडी, भिवंडी शहर | - सदस्य |
| १४) अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (एकतावादी), भिवंडी शहर | - सदस्य |
| १५) अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले), भिवंडी शहर | - सदस्य |
| १६) अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, भिवंडी शहर | - सदस्य |
| १७) अध्यक्ष, एम.आय.एम., भिवंडी शहर | - सदस्य |
| १८) श्री अभिजीत विजय शिरगावकर, शिरगावकर फाईन आर्ट, अंधेरी | - सदस्य |
| १९) श्री नितीन कुलकर्णी, आर्ट लुशन प्रा.लि., कांदिवली (पूर्व) | - सदस्य |
| २०) श्री प्रसाद पवार, शिल्पकार, स्टॅच्यु गारनेट | - सदस्य |
| २१) श्री जिवन धर्मराज धिवरे, आर्किटेक्ट | - सदस्य |
| २२) श्री बाळकृष्ण रामचंद्र नाईक, शिल्पकार | - सदस्य |
| २३) संबंधित सर्व समावेशक अधिकारी, भिनिशमनपा | - सदस्य |
| २४) शहर अभियंता, भि.नि.श.म.न.पा. | - सदस्य सचिव |

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**विषय :- अर्थसंकल्पीय तरतूदीचे पुनर्विनियोजनास मान्यता देणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद | दि.३/२/२०२३ पर्यत झालेला खर्च | दि. ३/२/२०२३ पर्यंतची शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १ | नाले गटार मो-या बांधणे | रु. ३५०.०० लक्ष | रु.३५०.०० लक्ष | रु. ०.०० लक्ष |
| | एकूण | रु. ३५०.०० लक्ष | रु.३५०.०० लक्ष | रु. ०.०० लक्ष |

सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये वरील लेखाशिर्षामध्ये निधीची कमतरता आहे. खालील विषयांकित दोन्ही प्रस्ताव रु.१९,८६,७७३/- रुपयाचे आहेत. मात्र निधी अभावी कामे होवू शकत नाही. तरी नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये शिल्लक नसल्यामुळे वरील लेखाशिर्षामध्ये खालील कामाकरीता नविन प्रशासकिय इमारतीत इंटेरिअर करणे या लेखाशिर्षामधुन पुर्नविनियोजन करावयाचे आहे. बांधकाम विभागातील अभियंते यांना विचारणा केली असता सध्या या दोन महिन्यात या लेखाशिर्षा अंतर्गत कोणतेही काम प्रस्तावित होणार नाही,असे त्यांनी सांगितले आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| १. प्रभाग क्र.१३ भादवड चौक सिंहगड इमारतीलगत ते श्री.अरुण पाटील यांचे घरालगत गटार व पाथवेज बनविणे. | रु. ९,९९,७४९/- | सदर कामाकरीता एकूण रु. २०.०० लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे. |
| २. प्रभाग क्र.१५ अंतर्गत नवीवस्ती मधील गुप्ता ते गौसीया चाळ येथील नाला बनविणे. | रु. ९,८७,०२४/- | |
| एकूण | रु.१९,८६,७७३/- | |

| अ. क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद | दि.३/२/२०२३ पर्यत झालेला खर्च | दि. ३/२/२०२३ पर्यंतची शिल्लक | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | नविन प्रशासकिय इमारतीत इंटेरिअर करणे | रु. ४०.०० लक्ष | रु.२.६६ लक्ष | रु. ३७.३४ लक्ष | रु.२०.०० लक्ष |
| | एकूण | रु. ४०.०० लक्ष | रु.२.६६ लक्ष | रु. ३७.३४ लक्ष | रु.२०.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३,व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो. व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांच्याकडे निहीत आहेत.

नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये रु.२०.०० लक्ष रुपयाचे नविन प्रशासकिय इमारतीत इंटेरिअर करणे या लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांनी दिनांक ८/२/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ८२

**दिनांक** ०९/०२/२०२३

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील १) प्रभाग क्र.१३ भादवड चौक सिंहगड इमारतीलगत ते श्री.अरुण पाटील यांचे घरालगत गटार व पाथवेज बनविणे. रु.१०.०० लक्ष २) प्रभाग क्र.१५ अंतर्गत नवीवस्ती मधील गुप्ता ते गौसीया चाळ येथील नाला बनविणे. रु.९.८७ लक्ष या कामांकरीता निधी नसल्याने नविन प्रशासकिय इमारतीत इंटेरिअर करणे या लेखाशिर्षामधून नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये रु.२०.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

CG

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**विषय :- अर्थसंकल्पीय तरतूदीचे पुनर्विनियोजनास मान्यता देणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा आयुक्त सा.ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद | दि.१६/१/२०२३ पर्यत झालेला खर्च | दि. १६/१/२०२३ पर्यंतची शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १ | परिसर आणि महापालिका इमारत दुरुस्ती | रु. ४५०.०० लक्ष | रु.४४०.१८ लक्ष | रु. ९.८२ लक्ष |
| | एकूण | रु. ४५०.०० लक्ष | रु.४४०.१८ लक्ष | रु. ९.८२ लक्ष |

सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये वरील लेखाशिर्षामध्ये निधीची कमतरता आहे. खालील विषयांकित कामाचे बिल हे रु.१३,०८,३५४/- रुपयाचे आहे मात्र परिसर आणि महापालिका इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये रु.९.८२ लक्ष शिल्लक असल्यामुळे वरील लेखाशिर्षामध्ये खालील कामाकरीता बी.जी.पी दवाखाना देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षामधुन पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील भुसार मोहल्ला मच्छी व मटन मार्केट इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. | रु. १३,०८,३५४/- | सदर कामाकरीता रु.३,२६,५११/- रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे. |
| एकूण - | रु. १३,०८,३५४/- | |

| अ. क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद | दि.१६/१/२०२३ पर्यत झालेला खर्च | दि. १६/१/२०२३ पर्यंतची शिल्लक | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | बी.जी.पी दवाखाना देखभाल व दुरुस्ती | रु. ५.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु. ५.०० लक्ष | रु.३.२७ लक्ष |
| | एकूण | रु. ५.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु. ५.०० लक्ष | रु.३.२७ लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३,व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो. व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्याकडे निहीत आहेत.

परिसर आणि महापालिका इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये रु.३.२७ लक्ष ची आवश्यकता आहे तरी बी.जी.पी दवाखाना देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षामधून रु.३.२७ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन वरील लेखाशिर्षामधून करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे.
त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिनांक १९/०१/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ९३ **दिनांक** ९/०२/२०२३

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील भुसार मोहल्ला मच्छी व मटन मार्केट इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. या कामाकरीता निधी अपुरा पडत असल्याने बी.जी.पी दवाखाना देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षामधून परिसर आणि महापालिका इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये रु.३.२७ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजनाने रक्कम वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**